# सदानंदाच्या यळकोटाने पालनगरी दुमदुमली

## सहा लाखांवर भाविकांची उपस्थिती : महाराष्ट्रासह कर्नाटक आंध्रप्रदेश मधील लाखो भाविकांच्या गर्दीत खंडोबाची यात्रा उत्साहात



**उंब्रज :** पाल (ता. कराड) येथे महाराष्ट्रासह आंध्र, कर्नाटक राज्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री खंडोबा व म्हाळसाकांत विवाह सोहळा गोरज मुहर्तावर आज मोठ्या उत्साहात पार पडला. 'यळकोट यळकोट जय मल्हार सदानंदाचा यळकोट' अशा जयघोषाने पाल नगरी दुमदुमुन गेली. या विवाह सोहळा पार पाडण्यासाठी लाखो भाविक सहभागी झाले होते.

महाराष्ट्रसह कर्नाटक आंध्र या राज्यातून आलेल्या भाविकांनी दक्षिण वाळवंटात सकाळच्या जेवणासाठी चुली मांडून स्वयपांकाची तयारी केली होती. यात्रेच्या मुख्य दिवशी वाळवंटात वाघ्या-मुरळी या नाचताना दिसत होत्या. परंपरेनुसार दुपारी एक वाजण्याच्या सुमारास देवस्थान ट्रस्टने बनवलेल्या स्वःमालकीच्या राजेशाही रथातून मिरवणूकीस प्रारंभ झाला. देवस्थानचे प्रमुख मानकरी देवराज पाटील यांच्या वाड्यापासून मिरवणुकीस सुरवात झाली. या सोहळ्यासाठी मानकरी, व-हाडी मंडळी मोठया संख्येने उपस्थित होती. फुले, तोरणे यांनी सजवलेल्या बैलगाड्यांतून श्री खंडोबाची व-हाडी मंडळी तारळी नदी पात्राकडे जाण्यासाठी निघाली प्रत्येक व-हाडी मंडळीच्या पूढे वाद्धयवृंद वाजवत ही मंडळी 'यळकोट यळकोट जय मल्हार, सदानंदचा यळकोट 'असा गजर करीत सर्व मानकरी व कारखाना मंदीराकडे ३ वाजणेच्या दरम्यान रवाना झाले. यावेळी देवाचे मुख्य मानकरी देवराज पाटील यांच्याकडे पुजारी यांनी विधिवत पुजा करुन खंडोबा व म्हाळसा यांच्या मुर्ती दिल्या. यानंतर भव्यदिव्य अशा रथामध्ये विराजमान होत श्री खंडेराया व म्हाळसा यांचे मुखवटे पोटाला बांधून प्रमुख मानकरी देवराज पाटील यांनी मुखवटे घेऊन रथात विराजमान झाले. यावेळी मंदीराच्या मुख्य प्रवेशद्वारातून मिरवणूक बाहेर येताच जमलेल्या लाखो भाविकांनी 'यळकोट यळकोट जय मल्हार सदानंदाचा यळकोट' असा जयघोष करीत भंडारा व खोबर्याची उधळण करीत पाल नगरी दुमदुमुन सोडली.

यानंतर सर्व मानकरी व कारखाना यांच्यासह शाही मिरवणुक वाळवंटात आली यावेळी लाखो भाविक या मिरवणूकीत सहभागी झाले. भंडारा व खोबर्याची रथावर उधळण करत यळकोट यळकोट जय मल्हार सदानंदाचा यळकोट अशा जागर करीत मिरवणुक हळुहळु लग्नं मंडपाकडे रवाना झाली. गोरज मुर्हतावर तिन्ही सांजेच्या आगोदर विवाह मंडपात पोहचली. नंतर बाहूल्यावरती व-हाडी मंडळीचा मानपानाचा विधी उरकण्यात आला. सायंकाळी ५ वा ४५ मि. गोरज मुहर्तावर श्री खंडोबा व म्हाळसा विवाह सोहळा पार पडला. भंडार्याच्या उधळीनंतर सारी पाल नगरी जणू सोनेरी झाल्याचे दिसून येत होती. तर सारा परिसर यळकोट यळकोट जय मल्हार, सदानंदाचा यळकोट या जयघोषाने दुमदुमुन गेला.

यावेळी प्रशासकीय यंत्रणा, ग्रामपंचायत, यात्रा कमेटी, देवस्थान ट्रस्ट यांनी यात्रेची तयारी चांगल्या पद्धतीने केली असल्याचे दिसुन आले. यात्रेकरुसांठी स्वच्छ पाणी, व मुबलक पाणी स्वच्छतागृहे, आदी सोयी उपलब्ध करण्यात आल्या होत्या. यात्रेसाठी येणा-या भाविकांसाठी उंब्रज,सातारा, कराड, पाटण येथून एस.टी.महामंडळाने जादा बसची सोय केली होती. तर शिरगाव, हरपळवाडी मार्गावर खाजगी वाहनांच्या पार्किंगची सोय करण्यात आली होती.

प्रशासनाच्यावतीने यात्रा काळात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखली जावी यासाठी जादा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सर्व सेवा सुविधासह पोलीस यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली होती. पोलीस प्रशासनाने आत्पकालीन जलद कृती दल, जमाव नियंत्रण पथक तैनात करण्यात आले होते. महत्वाच्या ठिकाणी गर्दीवर नजर ठेवण्यासाठी वॉच टॉवरवरती पोलीस तैनात केले होते. पोलीस अनावन्समेंटची खास सोय करण्यात आली होती. त्यावरून पोलीस वारंवार सूचना करत होते. तसेच पोलीस प्रशासनाने मंदीर परिसरात गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्पेशल कमांडो पथक नेमण्यात आले होते. याशिवाय आपत्कालीन दक्षता म्हणून जिल्हा प्रशासनाचे आपत्कालीन पथक, अग्निशामकदलाची पथके, आरोग्यविभाग पथके, रुग्णवाहीका, सज्ज ठेवण्यात आली होती. तर आत्पकालीन उपयोगासाठी पाल-वडगांव-इंदोली मार्ग पुर्णता मोकळा ठेवण्यात आला होता.

यावेळी अतिरिक्त पोलीस अधिक्षक आँचल दलाल, पोलीस उपअधिक्षक अमोल ठाकुर, प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे तहसीलदार विजय पवार, परिविक्षाधीन तहसीलदार श्री चंद्रा गटविकास अधिकारी प्रताप पाटील, सहाय्यक गटविकास अधिकारी विजय विभुते उंब्रज पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत बधे व कर्मचारी तसेच पोलीस पाटील, देवस्थान ट्रस्ट, यात्रा कमेटी, स्वयंसेवक यांनी यात्रेचे निटनेटके नियोजन करून यात्रा सुरळीतपणे पार पडली.

## शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य अद्वितीय : प्रा. डॉ. दीपक जाधव



**सातारा :** महाराष्ट्रामध्ये शिक्षण क्षेत्राचा प्रसार प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रमध्ये झाला आहे. त्यात शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचे कार्य अद्वितीय आहे.असे गौरवोद्गार जेष्ठ इतिहास अभ्यासक प्रा.डॉ.दीपक जाधव यांनी काढले.

येथील लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँण्ड कॉमर्स आयोजित श्री. स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह निमित्त आयोजित व्याख्यानात डॉ.जाधव बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.आर. तवर होते.यावेळी प्रा.डॉ.सुनील साठे व प्रा.डॉ. बिरामणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा.डॉ.जाधव पुढे म्हणाले, बऱ्याच लोकांना परंपरा असते. वारसा लाभलेला असतो. त्यामुळे ते मोठे कार्य करू शकतात. परंतु ज्यांना वारसा नाही. सामान्य परिस्थितीत जन्माला येऊन दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर उत्तम कार्य करू शकतो.डॉ. बापूजी साळुंखे यांचा जन्म स्वातंत्र्यपूर्व काळात झाला असून त्यांच्या आई-वडील लहानपणीच मृत्यू झाल्यामुळे त्यांची परिस्थिती अत्यंत हलक्याची होती. तरीसुद्धा त्यांनी नोकरीच्या मागे न लागता अविरत शिक्षणाचा ध्यास घेऊन शिक्षण पूर्ण केले.सामाजिक क्षेत्र सुधारण्यासाठी महात्मा फुले, स्वामी विवेकानंद, कर्मवीर अण्णा ते डॉ.बापूजी साळुंखे यांची परंपरा दिसते. यामध्ये विशेषता रयत व स्वामी या दोन शिक्षण संस्था शिक्षण क्षेत्रातील परिवर्तनाचे मुख्य कारण मानले जाते.डॉ.बापूजी साळुंखे यांच्यावर प्रामुख्याने साधुसंत आणि म. गांधी यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी सौंडुरचे सर्व राजवैभव सोडून स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले. सातारा जिल्हा हा त्याकाळी क्रांतिकारकांचा म्हणून संबोधला जात होता. त्या वेळेस आपणाकडे पत्री सरकार होते. त्यामध्ये नाना पाटील,लाड,नागनाथ नायकवडी व आबासाहेब वीर ही सर्व मंडळी कार्य करत होती.दुसऱ्या बाजूला बापूजी चळवळीमध्ये स्वातंत्र्य सैनिकांना मदत करत होते. क्रांतिकार्यामध्ये बापूजींचा प्रमुख सहभाग असायचा. त्यांनी क्रांतिकारक म्हणून ही कार्य केले. बापूजींनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन केली.या संस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे शिक्षण हे गरिबांच्या झोपडीपर्यंत गेले पाहिजे. ज्ञानगंगा घरोघरी गेली पाहिजे हा त्यामागचा उद्देश होता. हे त्यांचे कार्य अद्वितीय असे आहे.

डॉ.अशोक तवर म्हणाले, ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार करणारे शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक कार्याचा वारसा आपण सर्वांनी जतन केला पाहिजे.त्यांचे शिक्षण क्षेत्राप्रमाणेच स्वातंत्र्य लढ्यामध्येसुद्धा कार्य महत्वपूर्ण होते. प्रा.डॉ.वामन सरगर यांनी प्रास्ताविक केले.आग्रेश शिंदे यांनी आभार मानले.सदरच्या कार्यक्रमास वैभव सपकाळ, महाडिकसर आणि अध्ययनार्थी उपस्थित होते.

## सटाणा नगरपालिकेचं लचांड

### रस्त्याच्या मधोमध उभारलं अग्निशमनाचं नळकांड



**सटाणा :** सटाणा नगर परिषदेच्या पाणी पुरवठा, अग्निशमन विभाग व नगर व्यवस्थान विभागाच्या अभियंता आणि सल्लागारांच्या शैक्षणिक पदव्या तपासून पहाव्यात अशी परिस्थिती अलिकडे पालिकेच्या कार्यक्षेत्रातील काही करामतींमुळे आढळून येत आहे.

शहरातील काही ठिकाणी सांडपाण्याच्या निर्चय़ासाठी व्यवस्थाच नाही, ज्या ठिकाणी आहे तेथे दर्जा नाही, डुकरांचा हैदोस, मोकाट कुत्र्यांची भीती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संकुलातील ग्राहक संघाने गाळ्यांची केलेली बेकायदेशीर मोडतोड व अतिक्रमण अशा शेकडो समस्यांना नागरीक त्रस्त असताना अलिकडे नविन कामाचीही डोकेदुखी नागरिकांवर ओढवू लागली आहे.

पालिकेने शहरातील दाट वस्तींमध्ये अग्निआपत्तीवेळी ज्या ठिकाणी अशा अटीतटीच्या प्रसंगी अग्निबंब प्रवेश करु शकत नाही अशा ठिकाणी त्या-त्या वस्तींमध्ये पुर्वस्थितीत पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांवर अग्निशमन करण्यासाठीचे आपत्कालिन कार्यान्वित होणारे नळकांडे बसविण्याचे काम हाती घेतले आहे.

या कामामागे पालिकेच्या प्रशासनाचा हेतू चांगला असला तरी, प्रत्यक्ष नियोजन करणारे अभियंते आणि कर्मचारी यांनी नागरीकांना गैरसोयीचे होईल अशा पद्धतीने काम केल्याचे दिसून येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे गेल्या दहा ते बारा दिवसांपासून या कामाच्या हेतूने भलामोठा रस्ता खोदून ठेवला आहेच, पण त्याही पुढे त्रासदायक बाब म्हणजे जे अग्निशमन नळकांड उभारण्यात आले ते अतिशय अतार्किक, रस्त्याच्या मधोमध, गैरसोयीचे उभारण्यात आले आहे.

यामुळे रस्त्याच्या वाहतूकीला अडथळा तर आहेच, परंतू एखादे वाहन, लहान मुलांची सायकल अनावधानाने धडकून मोठी आपत्ती ओढवण्याची शक्यताही आहे.

हे खोदकाम करुन पंधरा दिवस होत असतानाही अद्याप रस्ता वापरण्यायोग्य पुर्ववत करण्यात न आल्याने नागरिकांना पायी चालणे, वाहनं घेऊन जाणे, कर्चय़ाच्या विल्हेवाटीसाठी घंटागाडीचा प्रवेश न होणे अशा असंख्य गैरसोयीस सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नगर पालिकेने उभं केलेलं हे लचांड लवकरात लवकर निस्तारण्यात यावं ही भावना परिसरातील नागरिकांची आहे.

## ३१ लाखांची फसवणूक

### खंडाळा तालुक्यात खळबळ

**खंडाळा :** सोन्याचे दागिने व बिस्किट बनवण्यासाठी पैसे घेऊन आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी खंडाळा येथील वैभव गोल्डन ज्वेलर्स दुकानाचे मालक व त्याची पत्नी अशा दोघांविरुद्ध खंडाळा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेमुळे खंडाळा तालुक्यात खळबळ उडाली आहे.

याबाबत खंडाळा पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की,खंडाळा येथील वैभव गोल्डन ज्वेलर्सचे मालक वैभव भास्कर धामणकर व त्याची पत्नी नीलम वैभव धामणकर या दोघांनी सैन्य दलातील सेवानिवृत्त रामदास किसन रामगुडे (मूळ रा.बावडा ता. खंडाळा सध्या रा.रणदुल्लाबाद ता. कोरेगाव) यांना सोन्याचे बिस्किट व दागिने करून देतो असे सांगत त्यांचा विश्वास संपादित करत २००९ ते २०१९ या कालावधीत त्यांच्याकडून ३१ लाख २ हजार २४८ रुपये इतकी रक्कम घेतली परंतु त्या बदल्यात रामगुडे यांना सोन्याचे दागिने किंवा बिस्किट काहीच दिले नाही. या सर्व प्रकारामध्ये आर्थिक फसवणूक झाल्याचे रामगुडे यांच्या लक्षात आले तसेच संबंधित ज्वेलर्स मालकाकडून इतर लोकांचीही आर्थिक फसवणूक झाल्याचे कळाल्याने रामगुडे यांनी खंडाळा पोलीस ठाण्यात धाव घेतली. याबाबत रामदास रामगुडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वैभव धामणकर व नीलम धामणकर या पती-पत्नीविरुद्ध खंडाळा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास खंडाळा पोलीस निरीक्षक सुनील शेळके करत आहेत.

## म्हसवड शहरात विविध ठिकाणी रामलल्ला प्रतिष्ठापणेचा धार्मिक सोहळा उत्साहात



**म्हसवड :** म्हसवड शहरात रामलल्ला प्रतिष्ठापणा सोहळा विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, यावेळी कुठे धार्मिक विधी, तर कुठे मंत्रपठण, कुठे रामरक्षा, कुठे हनुमान स्तोत्र पठण, तर काही ठिकाणी हनुमान चालीसा आदींचे सामुहिक वाचन करण्यात आल्याने अवघी म्हसवड नगरी ही रामनगरी बनल्याचा आभास जाणवत होती.

अयोध्या येथे उभारण्यात आलेल्या श्रीराम मंदिरात प्रभु श्रीरामाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठापणा होत असल्याने समस्त हिंदु धर्मियांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे, यानिमीत्त २२ जानेवारी हा दिवस एकप्रकारे दिवाळी सणाप्रमाणेच सर्वत्र साजरा होत आहे. म्हसवड शहरात ही यानिमीत्ताने सर्वत्र मोठा उत्साह दिसुन आला. सकाळी ६ वाजलेपासुनच या आनंदी सोहळ्यास सर्वत्र शुभारंभ करण्यात आला, येथील श्रीराम मंदिरात भल्या पहाटे प्रभु श्रीरामाची काकड आरती संपन्न झाली, मंदिरातच सकाळच्या प्रहरी भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर मंदिर व परिसरात सामुहिक रामनामाचा जप सुरु होता, तर सकाळी ८ वाजता श्रीराम मंदिरापासुन रामनामाचा जय घोष व जप करीत भव्य अशी फेरी काढण्यात आली, या फेरीमध्ये म्हसवड येथील सर्वच समाजाचे रामभक्त हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते, यामध्ये महिलावर्गाची उपस्थिती ही लक्षणीय होती. या फेरी मध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक रामभक्ताने डोक्यावर श्रीरामाच्या नावाची भगवी टोपी तर खांद्यावर भगवा गमजा, हाती भगवे वस्त्र, महिलांनीही भगवे फेटे, भगव्या साड्या परिधान केल्या होत्या, तर शहरातील प्रत्येक गल्ली बोळासह, मुख्य रस्ते, चौक याठिकाणी भगवे ध्वज लावण्यात आल्याने संपूर्ण म्हसवड नगरी ही भगवी व रामनगरी बनल्याचे दृष्य पहावयास मिळाले. या फेरीमध्ये माण - खटावचे आ. जयकुमार गोरे यांनी आपल्या पत्नीसह सहभागी होत रामनामाचा जयघोष केला. संपूर्ण शहराला नगरप्रदक्षणा घालुन सदर फेरी पुन्हा येथील राममंदिरासमोर उभारण्यात आलेल्या भव्य शामीयान्यात आली असता याठिकाणी पद्माकर शास्त्री वाळुंजकर, आप्पा देसाई, रत्नदिप शेटे यांनी रामरक्षा म्हटली यावेळी उपस्थित रामभक्तांनी एका सुरात रामरक्षा म्हटल्याने याठिकाणी धार्मिक वातावरण निर्माण झाले. तद्नंतर महाआरती संपन्न झाली तर दुपारी १२ वा. २९ मिनिटांनी श्रीरामाच्या मुर्तीस सर्वांनी मोठ्या श्रध्देने अक्षदा वाहत रामलल्लाचा जय घोष केला. यानंतर मंदिरात प्रसाद वाटण्यात आला.

येथील राममंदिराप्रमाणेच शहरातील विविध ठिकाणी अनेक धार्मिक कार्यक्रम यानिमीत्त ठेवण्यात आले होते, येथील डोंगरेवाडा परिसरात, व भगवानगल्ली येथे देशमाने यांच्या निवासस्थानी, येथील हनुमान मंदिर येथे, सिध्दनाथ मंदिरात, तर मेगासिटी येथे श्रीमती रेखा कुलकर्णी यांच्या निवासस्थानी प्रभु श्रीरामलल्लाच्या प्रतिमेवर अक्षदा वाहण्यात आल्या यावेळी वरील सर्व ठिकाणी विविध प्रकारची आकर्षण आरास व सजावट करण्यात आली होती. येथील हनुमान मंदिर येथेही यानिमीत्ताने सजावट करण्यात येवुन धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यानिमीत्त हनुमान मंदिर व मेगासिटी येथील कुलकर्णी यांच्या निवासस्थानी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

### म्हसवड शहरातील डॉक्टरांकडुन रामभक्तांना पेढे वाटप

**म्हसवड शहरात रामलल्लाची सकाळी फेरी काढण्यात आली त्यावेळी शहरातील सर्व डॉक्टरांनीही याठिकाणी भगवे वस्त्र परिधान करुन रामनामाचा जयघोष करीत उपस्थित सर्व रामभक्तांना पेढे वाटप करुन आनंदोत्सव साजरा केला.**

### श्री हनुमान मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

**म्हसवड शहरात असलेल्या काळा मारुती मंदिरात यानिमीत्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, तर संपूर्ण मंदिर हे पणत्यांनी सुशोभित करण्यात आले होते. यानिमीत्त मंदिरात भजन, मंत्रोपच्चार, हनुमान चालीसा, रामनामाचा जप आदी कार्यक्रम दिवसभर सुरु होते, याठिकाणी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते.**

## वाठार (किरोली) येथे आम्रवृक्षारोपण संपन्न



**सातारा :** वाठार (किरोली) येथे कालकथीत प्रल्हाद मारुती माने यांच्या शोकसभेचे औचित्य साधून आम्रवृक्षाचे रोपन करण्यात आले.

वृक्षारोपण केल्याने ऑक्सिजनची वाढ होणेस मदत होईल.वातारण शुध्द राहून पाऊस वेळेवर पडण्यास हातभार लागेल. ज्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृक्षारोपण केले आहे.त्यांची आठवण ज्या ज्या वेळी आपण त्या वृक्षाच्या छायेत येऊ तेव्हा होईलच.

प्रल्हाद माने यांनी देशसेवा करून ते सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात त्यांना दोन मुले व तीन मुली, सुना, नातवंडे,दोन भाऊ, बहिण,त्यांची मुले, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांचा एक मुलगा व मुलगी शिक्षक असून शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात काम करत आहेत. एक मुलगा फौजीत देशसेवा बजावत आहे.सदर कार्यक्रमास बौध्दाचार्य किशोर गायकवाड, माजी केंद्रप्रमुख गौतम माने, विजय माने, साहेबराव माने, अतुल माने,सुमा माने, गौतमी माने,वत्सला माने महेंद्र, रविंद्र व संपूर्ण माने परिवार,विलास माने, विलास माने, विनोद,सेवक, हणमंत, संतोष, निवास माने व माने - कांबळे परिवार व पै-पाहुणे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिहेकठापूर योजनेच्या पाण्याचे माण तालुक्यात जल्लोषात स्वागत

# योजना पूर्णत्वास, कृष्णेचे पाणी माणगंगेच्या भेटीला

**दहिवडी, :** सोमवारी दुपारी १२ वाजून २९ मिनिटांच्या शुभमुहूर्तावर अयोध्येत पंतप्रधान मोदींच्या हस्ते प्रभू रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा झाली अन तदक्षणी आ. जयकुमार गोरे आणि माणच्या जनतेचे स्वप्न साकार झाले. कृष्णामाई माण तालुक्यातील दुष्काळाची दाहकता कमी करण्यासाठी आंधळी धरणाकडे झेपावली. अनेक वर्षांच्या अथक संघर्ष आणि प्रयत्नानंतर आलेल्या जिहेकठापूर उपसा सिंचन योजनेच्या पाण्याचे माणवासियांनी जल्लोषपूर्ण वातावरणात स्वागत केले.

जिहेकठापूर योजनेचे पाणी खटाव तालुक्यातील नेर धरणात पोहचले आहे. सोमवारी दुपारी १२ वाजून २९ मिनिटांनी हे पाणी महिला आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत नेर तलावातून बोगद्यामधून आंधळी धरणात सोडण्यात आले. यावेळी सोनिया गोरे, कृष्णा सिंचन विभागाचे वरिष्ठ अधिकारी गायकवाड,



निकम साहेब , अपर्णा भोसले, सारिका मलकमीर, गौरी जगदाळे, अरुणा जगदाळे, रत्नमाला जगदाळे, संजय गांधी, सोमनाथ भोसले, प्रताप भोसले, शिवाजीराव जगदाळे, प्रमोद जगदाळे, बापूराव जगदाळे, सतीश ढोक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

गेल्या १४ वर्षात आ. जयकुमार गोरे यांना अथक प्रयत्न करुन जिहे कठापूर योजनेसाठी लागणारा निधी मिळविण्यात यश

**नेर धरणातून जिहेकठापूर योजनेच्या पाण्याचा भला मोठा प्रवाह आंधळी धरणाकडे झेपावताच उपस्थित महिलांच्या चेहऱ्यावर समाधान झळकले. अनेक महिलांनी आनंदाश्रूंना वाट मोकळी करुन दिली. आ. गोरेंच्या अथक प्रयत्नांना पंतप्रधान मोदी आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेले पाठबळ निर्णायक ठरले. आमच्यावरील दुष्काळाचे मळभ दूर झाले. आमचे आणि भविष्यातील पिढ्यांचे कल्याण झाल्याची भावना अपर्णा भोसले, सारीक मलकमीर आणि महिलांनी व्यक्त केल्या.**

आले. या योजनेची रखडलेली अनेक कामे मार्गी लागून एका नलिकेद्वारे पाणी नेर धरणात पोहचले होते. हे पाणी आंधळी धरणात नेण्यासाठी बोगद्याचे काम पूर्ण केल्यानंतर सोमवारी माण तालुक्यासाठी पाणी सोडण्यात आले. या पाण्याने आंधळी धरण भरल्यानंतर पंतप्रधान मोदींच्या हस्ते गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार जिहेकठापूर उपसा सिंचन योजनेचे १९ फेब्रुवारी रोजी जलपूजन करण्यात येणार आहे.

जिहेकठापूरचे पाणी आंधळी धरणात पोहचल्याने माणगंगा नदी प्रवाहीत होणार आहे. हेच पाणी उचलून तालुक्याच्या उत्तर भागातील ३२ गावांना देण्याची वाढीव योजना प्रगतीपथावर आहे. सर्वेक्षण करुन उर्वरित वंचित गावेही जिहेकठापूरच्या लाभक्षेत्रात आणण्याचे आ. जयकुमार गोरेंचे प्रयत्न अंतिम टप्प्यात आले आहेत. वर्षानुवर्षे दुष्काळी संकटात अडकलेल्या माणच्या जनतेला आज आंधळी धरणात आलेल्या पाण्याने मोठा दिलासा मिळाला आहे. रात्री पाणी आंधळी धरणात पोहचताच माणवासियांनी फटाके फोडून आणि पेढे वाटून जल्लोष साजरा केला.




## श्रीराम मंदिर सजले आकर्षक फुल सजावटीने

रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठापणेच्या सोहळ्यानिमीत्त येथील श्रीराम मंदिरावर आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे, तर संपूर्ण मंदिराला विविध फुलांची सजावट करण्यात आल्याने श्रीराम मंदिराचे रुपडे पालटले होते.

सिध्दनाथ मंदिरात रामलल्ला प्राणप्रतिष्ठापणा सोहळा संपन्न ।

म्हसवड : लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले म्हसवडचे ग्रामदैवत श्री. सिध्दनाथ मंदिरात श्रीरामलल्ला च्या प्राणप्रतिष्ठपणेचा सोहळा विविध धार्मिक पध्दतीने साजरा करण्यात आला, यावेळी प्रभूरामचंद्र, सीतामाई व लक्ष्मण तसेच हनुमान व श्री भोलेनाथ शंकर यांच्या मूर्ती मोठ्या जल्लोषात व श्रीरामाच्या जयघोषात मंदिरातील सिंहासनावर विराजमान करण्यात आल्या.

दरम्यान, एक आठवडा अगोदर पासून सिद्धनाथ मंदिर गाभाऱ्यापासून प्रदक्षिणा मार्ग तसेच संपूर्ण मंदिर परिसर झाडून स्वच्छ करून धुवून घेण्यात आला होता या कामांमध्ये आमदार जयकुमार गोरे यांनीही कार्यकर्त्यांसह आपला सहभाग नोंदवला होता .त्यानंतर गाभारा, हत्ती मंडप, प्रदक्षिणामार्ग, मंदिर परिसर आणि शिखर यावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती आजच्या दिवशी मंदिर परिसरातील सर्व गुरव समाजाच्या घरोघरी आकर्षक रेखीव रांगोळ्या काढून उंच गुढ्या उभारण्यात आल्या होत्या सर्व परिसरात भगवे झेंडे लावण्यात आले होते, सकाळपासून मंदिरामध्ये विविध मंडळांचे भजनाचे कार्यक्रम सुरू होते. त्यानंतर सकाळी साडेदहाच्या दरम्यान शहराच्या मुख्य पेठेतून श्री प्रभू राम, सीता, लक्ष्मण, हनुमंत आणि श्री. शिवशंकर यांच्या मूर्ती ढोल ताशांच्या गजरासह जय श्रीरामाच्या जयघोषात मिरवणूक काढण्यात आली.

त्यानंतर मंदिराच्या गाभाऱ्यात सिंहासनावर सदर मूर्ती ठेवण्यात येऊन त्यांचे पूजन करण्यात आले त्यानंतर हत्ती मंडपाच्या पाठीमागे सजविण्यात आलेल्या सिंहासनावर या मूर्ती विराजमान करण्यात आल्या. सदर विधी धार्मिक पद्धतीने करण्यात आला. मूर्ती विराजमान झाल्यानंतर हनुमान चालीसा, रामरक्षा स्तोत्र, सामूहिक रामनामाचा जप, महाआरती आणि बरोबर १२ वाजून २९ मिनिटांनी अक्षतांसह पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर जमलेल्या तमाम राम भक्तांना सिद्धनाथ देवस्थान व गुरव समाज यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## दुधेबावी ग्रामविकास प्रतिष्ठानचे कार्य प्रेरणादायी : समीर शेख

**फलटण :** दुधेबावी ग्रामविकास प्रतिष्ठानची प्रबोधनाची चळवळ, सामाजिक उपक्रमातील सातत्य निश्चितच प्रेरणादायी असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी सांगितले.

दुधेबावी ता. फलटण येथील ग्रामविकास प्रतिष्ठानच्या दिनदर्शिकेच्या प्रकाशन कार्यक्रमप्रसंगी समीर शेख बोलत होते.यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांची प्रमुख उपस्थिती होती. समीर शेख म्हणाले, सामाजिक प्रबोधन ही काळाची गरज असून परिसरातील प्रशासकीय अधिकाऱ्यांचे सहकार्य, मार्गदर्शन घेतल्यास सामाजिक कार्यास गती येईल असे त्यांनी निदर्शनास आणले. दुधेबावी प्रतिष्ठानच्या सामाजिक उपक्रमास सहकार्य करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष शशिकांत सोनवलकर यांनी प्रास्ताविकात सातत्यपूर्ण २३ वर्ष राबवित असणारी संत गाडगेबाबा



व्याख्यानमाला, मोफत आरोग्य शिबीरे, वाचनालय याबाबतीत माहिती विशद केली.यावेळी जिल्हा शिक्षक बँकेचे चेअरमन राजेंद्र बोराटे, व्हाईस चेअरमन विजय बनसोडे, संचालक तानाजी कुंभार, विक्रम डोंगरे, फलटण तालुका ग्रामीण पत्रकार संघांचे अध्यक्ष सुभाष सोनवलकर,प्रा. लक्ष्मण एकळ, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विजयकुमार नाळे, कार्याध्यक्ष संतोष भांड,प्रा. महेंद्र एकळ, सचिव विठ्ठल सोनवलकर, खजिनदार डॉ. युवराज एकळ,सांस्कृतिक कमिटीचे अध्यक्ष सचिन सोनवलकर, सचिन काळे,राहुल नाळे, वनपाल चंद्रकांत गेजगे,संचालक भानुदास सोनवलकर, राजेंद्र नाळे, ज्ञानेश्वर सोनवलकर,संतोष मोरे,शेखर चांगण ,सुमित नाळे, यांचेसह मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन संत गाडगेबाबा व्याख्यानमाला कमिटीचे अध्यक्ष डॉ. सागर कराडे यांनी केले. स्वागत सांस्कृतिक कमिटीचे अध्यक्ष सचिन सोनवलकर यांनी केले.प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विजयकुमार नाळे यांनी आभार मानले.

# वडगावात जय श्रीरामाचा जयघोष

## मिरवणुकीत जय श्रीरामाचा जयघोष करत हजारो राम भक्तांनी सहभाग घेतला

**वडगाव मावळ :** आयोध्यातील प्रभू श्रीराम मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्त वडगाव येथील,श्री पोटोबा देवस्थान संस्थान, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, सामाजिक संस्था व ग्रामस्थांच्या वतीने सोमवार (दि २२)भव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीत जय श्रीरामाचा जयघोष करत हजारो राम भक्तांनी सहभाग घेतला

सायंकाळी पंचमुखी मारुती मंदिर ते ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज मंदिरात पर्यंत हि मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीत सर्व समाजातील रामभक्तांसह पारंपरिक वेशभूषेत महिलाही लक्षणीय संख्येने उपस्थित झाल्या.आकर्षक सजावट करण्यात आलेल्या रथामध्ये आयोध्यातील श्रीराम प्रभू मंदिराची प्रतिकृतीची मिरवणूक प्रभू श्रीराम सीता आणि लक्ष्मण यांच्या वेशभूषेतील कलाकारांनी लक्ष वेधून घेतले.

यावेळी ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज मंदिरांवर आकर्षक




विद्युत रोषणाई, फुलांची आकर्षक सजावट, करण्यात आली घरोघरी रांगोळी, छतांवर फडकणारे भगवे ध्वज जय श्रीराम जयघोषाने वडगाव शहर दुमदुमून गेले

दरम्यान पहाटे श्री हनुमान मंदिर व श्रीराम मंदिरात अभिषेक, काकड आरती व त्यानंतर भजनाचा कार्यक्रम झाला. अयोध्या येथे होणाऱ्या कार्यक्रमाचे एलईडी स्क्रीनवर थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले.

दरम्यान सायंकाळी श्री पोटोबा मंदिराच्या प्रांगणात अयोध्या येथे गेलेल्या कारसेवकांचा व कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. यावेळी देवस्थानचे मुख्य विश्वस्त सोपानराव म्हाळसकर गणेशअप्पा ढोरे, अनंता कुडे,विश्वस्त चंद्रकांत ढोरे, सुभाष जाधव, तुकाराम बुवा ढोरे, अशोक ढमाले,अरूण चव्हाण,किरण भिलारे

सुनीता कुडे,यांच्यासह सर्व विश्वस्त, सर्व राजकीय पक्षीय पदाधिकारी व भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

पोटोबा मंदिराच्या प्रांगणात महाप्रसादाने या आनंदोत्सवाची सांगता झाली. या सोहळ्यात स्व. पै. केशवराव ढोरे प्रतिष्ठानने गावातील सर्व मंदिरात फुलांची आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई केली होती. मोरया प्रतिष्ठानने मिरवणुक तर माजी सभापती गुलाब म्हाळसकर यांनी दुपारच्या प्रसादाची तर उद्योजक सुनील वासवानी व माजी नगरसेवक उपसभापती प्रवीण चव्हाण यांनी र महाप्रसादाची व्यवस्था केली होती. उद्योजक दत्तात्रेय कुडे, गणेश भेगडे व किरण भिलारे यांनी दीपोत्सवाचे संयोजन केले. या सर्वांचा सत्कार करण्यात आला.

### ग्रामस्थांकडून दिवाळी

**देवस्थान ट्रस्टने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन ग्रामस्थांनी दिवाळी सणाप्रमाने हा सोहळा साजरा केला. घरोघरी रांगोळ्या काढण्यात आल्या. घराच्या छतावर भगवा ध्वज लावण्यात आला होता. पणत्या व काहींनी आकाश कंदीलही लावले होते. गोडधोड नैवेद्य केला होता. संपूर्ण गाव या आनंद सोहळ्यात सहभागी झाले होते.**

# 'भाजपच्या छातीत भरली धडकी...'

## काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांची टीका

**पुणे :** सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचच्या छातीत धडकी भरली आहे. निवडणुकांना सामोरे जाण्याची त्यांची हिंमत नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जात नाहीत, अशा शब्दात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजपवर टीका केली.

काँग्रेसची महत्त्वाची आढावा बैठक येथे पार पडली. त्यानंतर काँग्रेस नेत्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी पृथ्वीराज चव्हाण बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून आगामी लोकसभा निवडणूक व्यक्ती केंद्री बनविण्याचे प्रयत्न सुरू असून त्याला काही प्रमाणात यश येत आहे. मात्र, भाजपकडून पक्षाच्या जागा वाढण्याचे केले जाणारे दावे अतिरंजित आहेत. मतदारसंघांचा आढावा घेतला असता भाजपच्या जागा वाढण्याची कोणतीही शक्यता नाही, असा दावा चव्हाण यांनी यावेळी केला.

मोदी यांनी सन २०१४ ची निवडणूक आर्थिक मुद्द्यावर लढवली. सन २०१९ मध्ये बालाकोट हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नावर निवडणूक लढवली. या वर्षात होणाऱ्या निवडणुकीसाठी इतर कोणताही मुद्दा नसल्यामुळे त्यांनी राम मंदिराचा 'इव्हेंट' घडवून आणला अशी टीका करून चव्हाण पुढे म्हणाले की, अयोध्येत उभारण्यात आलेले राम मंदिर मूळ जागेपासून चार किलोमीटर दूर आहे. त्या ठिकाणी मूळ मूर्ती कुठे आहे? नव्या मूर्ती कशा आल्या? मंदिराचे काम अर्धवट असल्यामुळे शंकराचार्यांनी प्राणप्रतिष्ठापनेच्या कार्यक्रमाला विरोध केला. कदाचित त्यामुळे ज्योतिषाला विचारून पुढील अरिष्ट टाळण्यासाठी मोदी यांनी उपवास केले, जमिनीवर झोपले. मात्र, जे घडायचे ते घडणारच, अशा शब्दात चव्हाण यांनी पंतप्रधानांची खिल्ली उडवली.

महाराष्ट्राच्या राजकारणात कोणी अपेक्षाही केली नसेल एवढे मोठे राजकीय भूकंप होतील, या गिरीश महाजन यांच्या विधानाचाही चव्हाण यांनी समाचार घेतला. सत्ताधारी गोटाकडून उगीचच 'या पक्षातून हा येणार, त्या पक्षातून तो येणार,' अशा वावड्या उठवण्याचे काम चालू आहे. प्रत्यक्षात सत्ताधाऱ्यांमध्ये निवडणुकीला सामोरे जाण्याचे धाडस नाही, असेही चव्हाण म्हणाले.

# 'समूह शाळांबाबत राज्य सरकारचे खोटे प्रतिज्ञापत्र'

## न्यायालयाने कार्यवाही करण्याची वंचित बहुजन आघाडीची मागणी

**मुंबई :** शाळेतील कमी पटसंख्या, त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक सोयीसुविधा पुरवण्यात येणाऱ्या अडचणी, कमी पटसंख्येमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण न होणे अशी कारणे देत राज्य सरकारने २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा समूह शाळांमध्ये रुपांतरित करण्याचा निर्णय घेतला होता.

राज्य शासनाचा निर्णय शिक्षण हक्क कायद्याचे (आरटीई) उल्लंघन करणारा होता. समूह शाळेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून १ किंवा ३ किलोमीटरच्या आत शाळा उपलब्ध होणार नसून समूह शाळांच्या नावाखाली कमी पटसंख्येच्या शाळा बंद करणाऱ्या राज्य सरकारच्या सप्टेंबर महिन्यातील योजनेची उच्च न्यायालयाने स्वत:हून दखल घेऊन याप्रकरणी जनहित याचिका (सुओमोटो) दाखल करून घेतली आहे.

मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर सोमवारी या प्रकरणी झालेल्या सुनावणीच्या वेळी सरकारी वकील प्रियभूषण काकडे यांनी प्रतिज्ञापत्र दाखल करून सरकारची भूमिका स्पष्ट केले. तसेच, सरकारने समूह शाळा सुरू करण्याबाबतचा निर्णय अद्याप घेतलेला नसल्याचे सांगितले.

समूह शाळा सुरू करण्याचा निर्णय अद्याप तरी घेतलेला नाही, असा दावा राज्य सरकारने सोमवारी उच्च न्यायालयात केला.

सध्या या प्रस्तावित योजनेची व्यवहार्यता तपासण्यासाठी आवश्यक माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे. परंतु, याबाबतच्या आंतरविभागीय पत्र प्रसिद्धीमाध्यमांना मिळाले आणि त्यांनी त्याचा चुकीचा अर्थ लावून वृत्त प्रसिद्ध केली, असा दावा सरकारने प्रतिज्ञापत्राद्वारे न्यायालयात केला असून राज्य सरकार खोटे प्रतिज्ञापत्र सादर करून न्यायालयाची आणि जनतेची दिशाभूल करीत आहे, असा वंचित बहुजन आघाडीच्या आरोप आहे.

केंद्र सरकारने दिलेल्या निर्देशानुसार राज्य सरकार ही योजना राबविणार असल्याचे शासन निर्णय आणि शिक्षण विभागाचे पत्रव्यवहार ह्या द्वारे सिद्ध होत आहे. मात्र, तरीही सरकार न्यायालयात धडधडीत खोटे बोलत आहे. बंद केल्या जाणाऱ्या शाळा ह्या मोक्याचे जागेवर असल्याने त्याचा व्यापारिक लाभ घेण्यासाठी सरकारने ह्या शाळा खाजगी व्यवस्थापनाकडे सोपविण्याचा डाव आखला आहे. मात्र, न्यायालयाने स्वतः ह्याची दखल घेत याचिका दाखल करून घेतल्याने सरकार तोंडघशी पडले आहे. त्यामुळे न्यायलायात खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. उच्च न्यायलयाने ह्याची दखल घेऊन सरकारला न्यायालयाची दिशाभूल केल्याबद्दल सरकारवर कार्यवाही करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते राजेंद्र पातोडे ह्यांनी केली आहे.

## 'पक्षांतर्गत निवडणुका संदर्भातील कागदपत्र बंद कपाटातून गायब'

### राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जीतेंद्र आव्हाड यांचा सुनावणी दरम्यान आरोप

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये नियमितपणे पक्षांतर्गत निवडणुका घेतल्या जातात. मात्र, पक्षांतर्गत निवडणुकीसंबंधी कागदपत्र आणि पुरावे बंद कपाटातून गायब झाले आहेत, असा आरोप शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभा अध्यक्षांसमोर आमदार अपात्रता प्रकरणी सुरू असलेल्या सुनावणी दरम्यान केला आहे.

पक्षांमध्ये नियमितपणे अंतर्गत निवडणुका घेतल्या जातात. त्यासंबंधीच्या गोपनीय कागदपत्रांचा सांभाळ करण्याची जबाबदारी दोन जबाबदार व्यक्तींकडे होती. मात्र, ही कागदपत्र आणि पुरावे बंद कपाटातून गायब झाले आहेत. ही सांभाळण्याची जबाबदारी असलेल्या दोघांनी पक्ष सोडला आहे. त्यांनी या कागदपत्र आणि पुराव्यांचे काय केले, याबाबत आपल्याला माहिती नाही, असे आव्हाड यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर आमदार अपात्रते संबंधी निर्णय घेण्यासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी सुरू असून आव्हाड यांची साक्ष नोंदविण्यात आली. यावेळी अजित पवार गटाच्या वकिलांनी त्यांची उलट तपासणीही घेतली. आव्हाड यांनी प्रतिज्ञापत्र व्यतिरिक्त इतर काही कागदपत्र आपल्याजवळ बाळगल्याबद्दल अजित पवार गटाच्या वकिलांनी आक्षेप नोंदवला.

## 'झोंबी विषाणूमुळे जगभरात पसरू शकते नव्या साथरोगाची लाट'

### शास्त्रज्ञांनी दिला आर्क्टिकमधील बर्फात हजारो वर्ष गाडला गेलेल्या विषाणूच्या फैलावाचा इशारा



**वॉशिंग्टन :** संपूर्ण जगाला तब्बल अडीच वर्ष वेठीला धरणाऱ्या कोरोना महामारीचा धोका अद्याप पूर्णपणे संपुष्टात आलेला नसतानाच आता झोंबी विषाणूमुळे नवी महामारी उद्भवण्याचा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. हा विषाणू कोरोनापेक्षाही अधिक धोकादायक ठरू शकतो, याची जाणीवही तज्ञांनी करून दिली आहे.

झोंबी नावाचा विषाणू तब्बल ४८ हजार ५०० वर्षांपूर्वीपासून आर्क्टिकमधील बर्फात गाडला गेला आहे. काही काळापूर्वी शास्त्रज्ञांनी घेतलेल्या बर्फाच्या नमुन्यांमध्ये या विषाणूचे अस्तित्व दिसून आले आहे. मागील काही काळापासून जागतिक तापमान वाढीमुळे आर्क्टिकमधील बर्फ वितळू लागले आहे. या बर्फ वितळल्यामुळे झोंबीचा विषाणू मुक्त होऊन जगभर महामारी फैलवू शकतो, अशी माहिती एक्स-मार्सिले विद्यापीठाच्या तज्ज्ञांनी दिली आहे.

### सायबेरियाच्या परिसरात निरीक्षण कक्ष कार्यान्वित

**सायबेरियाच्या ज्या बर्फाच्छादित परिसरात झोंबी विषाणूचे अस्तित्व आढळून आले आहे त्या परिसरात विषाणू क्रियाशील होत आहे काय याचे निरीक्षण करण्यासाठी तज्ज्ञांचा समावेश असलेले विशेष निरीक्षण केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. हा विषाणू क्रियाशील झाल्यास सुरुवातीच्या टप्प्यातच त्याची माहिती मिळाल्याने त्याचा पहिला रोखणे शक्य असल्याने हे पाऊल उचलण्यात आले आहे.**

**मागील काही काळापासून अनेक प्रकारचे नवनवे विषाणू व जिवाणू विकसित होत आहेत. त्याचप्रमाणे हजारो वर्षांपूर्वीपासूनचे जुन्या विषाणूंचे अस्तित्व उघड होत आहे. केवळ सायबरीयाच नव्हे तर जगाच्या अनेक भागात बर्फ वितळण्याचे प्रकार तापमानवाढीमुळे घडत आहेत. त्यामुळे जुन्या विषाणूंचा फायदा होण्याची टांगती तलवार जगावर असणार आहे, असा शास्त्रज्ञांचा दावा आहे.**

# मांजरवाडीमध्ये माती परीक्षण प्रत्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन



**नारायणगाव :** मांजरवाडी, ता.जुन्नर येथे मावळ तालुक्यातील पद्मभूषण वसंतदादा पाटील कृषी महाविद्यालय, आंबी येथील कृषीदूतांच्या वतीने ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत माती परीक्षण प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते .

परिसरातील शेतकऱ्यांमध्ये माती परिक्षण अंतर्गत जनजागृती व्हावी या दृष्टीकोनातून हा उपक्रन राबविण्यात आला.

यावेळी कृषीदूत अनुराग वानखडे, अथर्व देशमुख , केशव गोगडे, हर्षण चौधरी, तपन जैन यांनी शेतकरी बांधवांना मार्गदर्शन केले.

या उपक्रमांसाठी महविद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ . भाग्योदय खोब्रागडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अविनाश खरे व कार्यक्रम अधिकारी डॉ. सचिन कंकाल यांचे मार्गदर्शन लाभले.

माती परिक्षण हे पिक काढल्यानंतर किंवा पेरणीपूर्वी, रासायनिक खते देण्यापूर्वी किंवा खत दिल्यानंतर तीन महिन्यानंतर मातीचा नमुना घ्यावा, माती परिक्षणानुसार खत व्यवस्थापन करावे असा सल्ला कृषीदूतांनी शेतकऱ्यांना दिला.

याचबरोबर शेतीतील मातीचे नमूने गोळा करून त्याचे सुनियोजित परीक्षण करण्यात आले. मातीमध्ये असणारे घटक जमिनीची क्षमता, मातीचा प्रकार या विषयी शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन कृषी दूतां मार्फत करण्यात आले.

# तापोळा भागातील सोमजाई काळेश्वरी देवीची वार्षिक यात्रा सुरू



**तापोळा :** कोयना धरणाच्या निर्मितीनंतर कोयना जलाशयामुळे जगप्रसिद्ध पावलेल्या तापोळा विभागातील आपटी, केळघर, फुरुस, हात्रेवाडी व निपाणीचे ग्रामदैवत असलेल्या श्री सोमजाई काळेश्वरी देवीची वार्षिक यात्रा मोठ्या भक्ती भावाने व धूम धडाक्यात सुरू झालेली आहे.

या वार्षिक यात्रेसाठी पुणे मुंबई नवी मुंबई ठाणे पनवेल या परिसरातील स्थानिक ग्रामस्थ आपल्या कुटुंब मित्र परिवारास आलेले आहेत. बुधवार, दि. २४ व गुरूवार, दि. २५ जानेवारी रोजी परी पद्धतीनुसार ही वार्षिक यात्रा संपन्न होत आहे.

दि. २४ रोजी सकाळी ७ वाजता देवीची आरती सुरु होते. तदनंतर बुंडा जागराचे आयोजन केले जाते. यावेळी देवीचा गोंधळ घातला जातो. त्यानंतर आपटी गावात घरोघरी पालखी फिरविण्यात येते. रात्री ९ ते १० लेझीम पथकांचा कार्यक्रम होणार आहे. रात्री १० वाजता कोल्हापूर येथील नामांकित आर्केस्टा धमाका हा कार्यक्रम होणार आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार त्यानंतर रात्री १२ वाजता मोठ्या जल्लोषात छबिना काढण्यात येणार आहे. यात्रेसाठी गावी आलेले भाविक व यात्रेकरू पालख्यां आपल्या खांद्यावर घेऊन छबिना काढतात. रात्री १ वाजता बायना शारदा सातारकर यांचा मनोरंजनासाठी तमाशा होणार आहे.

गुरूवार, दि. २५ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत तमाशाचा कार्यक्रम होईल. त्यांनतर ३ ते ५ जंगी कुस्त्यांचे फड भरवण्यात येईल, अशी माहिती ग्रामस्थ मंडळ आपटी यांनी दिली. सदरची पालखी इतर गावातील भाविकांसाठीही घेऊन जाण्यात असते. दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व या भागातील सुपुत्र एकनाथ शिंदे हे आपल्या दरेगावी आल्यामुळे बहुदा ते ही या ग्रामदैवताच्या दर्शनला येथील अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## बाबासाहेबांचे गाणे वाजवले म्हणून कामावरुन काढले

# पण कार्यकर्त्यांनी त्याच सुपरमार्केटसमोर मोठ्या आवाजात भीमगीते वाजवून नोंदविला अनोखा निषेध

**सटाणा :** येथिल एका सुपरमार्केट मध्ये काही बौद्ध समाजातील मुलं गेल्या अनेक महिन्यांपासून कामासाठी होते. काल दि. २१ जानेवारी रोजी त्यापैकी एका कर्मचाऱ्याने स्वत:च्या मोबाईलवर बाबासाहेबांचं गाणं वाजवलं म्हणून सुपर मार्केटच्या मालकाने त्यांना ते गाणं बंद करायला सांगीतलं, यावरुन कर्मचारी आणि मालक यांमध्ये किरकोळ बाचाबाची झाली. मात्र विषय एवढ्यावरच थांबला नाही तर संबंधीत सुपरमार्केटच्या संचालकाने कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांना सायंकाळी सांगितलं की, तुमचा हिशेब केला आहे, उद्यापासून कामावर येवू नका.

याघटनेची रात्री उशीरापर्यंत समाजमाध्यमाद्वारे सर्वत्र चर्चा पसरत निषेधही नोंदविला जावू लागला होता. संबंधीत कर्मचाऱ्यांनी त्यांना मिळालेल्या अपमानास्पद वागणूकीमुळे व त्यांच्या अस्मितांना ठेच पोहचल्याची भावना ठेवत घडलेला प्रकार काही कार्यकर्त्यांकडे व्यक्त केला असता संबंधित कर्मचारी आणि कार्यकर्त्यांनी पोलीस ठाणे गाठले व लेखी तक्रार केली. सटाणा पोलीस ठाण्याचे निरिक्षक संदिप रणदिवे यांनी संबंधीत सुपरमार्केट संचालकाला बोलावून घेतले घडलेल्या प्रकाराविषयी सर्व बाजूने चर्चा करत दोघं पक्षकारांना समज दिली.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस अल्पसंख्याक विभागाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी मो नाजीम रजवी यांची निवड

**हिंगोली :** राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी चे अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश उपाध्यक्षपदी कळमनुरी नगर परीषदे चे माजी उपनगराध्यक्ष मो नाजीम रजवी यांची निवड करण्यात आली आहे

दिनांक १७ जानेवारी २४ रोजी मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या शासकीय निवास देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी चे अल्पसंख्याक विभागाची राज्यस्तरीय बैठक झाली या बैठकीत राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार राष्ट्रवादी कॉँग्रेस चे प्रदेशाध्यक्ष खा सुनील तटकरे वैधकिय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ राष्ट्रवादी कॉँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश निरीक्षक नजिब मुल्ला आ बाबाजानि खान दुर्राणी युसुफ सेठ पुंजाणि,



राष्ट्रवादी कॉँग्रेस चे सरचिटणीस शिवाजीराव गरजे राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष सुरज दादा चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी कॉँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस भाई नाईकवाडे व प्रदेश कार्याध्यक्ष वसिम बुरहान यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस अल्पसंख्याक विभागाची राज्यस्तरीय कार्यकारिणी जाहिर केली असुन या बैठकीत कळमनुरी चे माजी उपनगराध्यक्ष मो नाजीम रजवी यांची राष्ट्रवादी कॉँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

या निवडी बद्दल वसमत चे आ राजु भैय्या नवघरे राष्ट्रवादी कॉँग्रेस चे जिल्हाध्यक्ष बि डि बांगर असद कादरी आतिक आतार विजय गावंडे आवेस पठान मुशताक मामु हाफिज मामु यासिन कुरेशी आहेमद पठान शे साजीद इरफान खान पठान शोहिब बागवान सय्यद बबलू विठ्ठल गाभणे युसुफ भाई आजमतुला फारुखी खुर्शिद फारुखी हाकिम बागवान यांच्या सह आदींनी मो नाजीम रजवी यांचे अभिनंदन केले आहे

# सूर्यप्रभा ' माईंची जयंती; शनिवारी कल्याणला परिसंवाद



**मुंबई :** भारतीय संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुविद्य पत्नी डॉ. माईसाहेब आंबेडकर यांची वी जयंती येत्या शनिवारी २७ जानेवारी रोजी राज्यात साजरी होणार आहे. त्यानिमित्ताने ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ यांच्या माईंवरील ग्रंथाला मुंबई मराठी पत्रकार संघाचा जयहिंद प्रकाशन पुरस्कार मिळाल्याबद्दल

' सूर्यप्रभा माई ' या विषयावर एक परिसंवाद कल्याण ( पश्चिम) येथे पार पडणार आहे.

संध्याकाळी ४ वाजता शिवाजी चौक येथील सार्वजनिक वाचनालय सभागृहात संविधान समर्थक दलातर्फे हा परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

ज्येष्ठ पँथर - रिपब्लिकन नेते श्यामदादा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालील या परिसंवादात प्रख्यात कवी अरुण म्हात्रे, स्तंभलेखक प्रा. अविनाश कोल्हे, प्रा. डॉ. विठ्ठल शिंदे, प्राचार्य डॉ. मिलिंद तायडे, प्रभाकर ओव्हाळ हे विचारवंत वक्ते आहेत, अशी माहिती प्रख्यात संशोधक विजय सुरवाडे आणि संविधान समर्थक दलाचे सरचिटणीस सतीश डोंगरे यांनी एका पत्रकात दिली आहे.

# पुणे येथील अधिस्वीकृती समितीच्या बैठकीत दहा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर

**सातारा :** महाराष्ट्र शासनाच्या पुणे विभागाच्या पत्रकारांसाठी असलेल्या अधिस्विकृती समितीची दुसरी बैठक आज पुणे येथील विभागीय कार्यालयात झाली.

या बैठकीला समितीचे अध्यक्ष हरिष पाटणे,सदस्य सचिव तथा पुणे विभागाचे माहिती उपसंचालक डॉक्टर राजू पाटोदकर, समितीचे सदस्य गोरख तावरे ,चंद्रसेन जाधव ,सूनित भावे ,सातारा जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे ,पुणे जिल्हा माहिती अधिकारी मोघे, सोलापूर जिल्हा माहिती अधिकारी सोनटक्के यांच्यासह



**पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीच्या बैठकीत चर्चा करताना मान्यवर**

माहिती उपसंचालक व तीनही जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयातील संबंधित कर्मचारी तसेच अधिकारी राहुल पवार व इतर उपस्थित होते.

बैठकीत सातारा, पुणे, सोलापूर जिल्ह्यातील अकरा प्रस्ताव पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीच्या समोर आले .त्यापैकी दहा प्रस्तावांना मंजुरी देऊन राज्य समितीकडे पाठवण्यात आले आहेत.राज्य समिती साठी पुणे विभागातून पत्रकारांच्या हिताचे काही ठराव ही पाठवण्यात आले .अधिस्वीकृती पत्रिका मंजूर करण्यासाठी आवश्यक कागदपत्र तपासणी करून त्याला मंजुरी देण्यात येते. ग्रामीण भागातील काही जेष्ठ पत्रकारांना अद्याप अधिकृत पत्रिका मिळाली नाही. काहींना आयकर भरत असल्याने सेवानिवृत्ती वेतन दिले जात नाही. याबाबत काही सुट देवून नव्याने नियमावली लागू करण्यात येण्यासाठी सद्यस्थितीत प्रयत्न सुरू झाले आहेत. त्याबद्दल या समितीचे सातारा, पुणे, सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पत्रकारांच्या वतीने जेष्ठ पत्रकार बाळासाहेब आंबेकर, अजित जगताप व डायनेल खुडे मान्यवरांनी आभार मानले आहेत. सद्या रेल्वे प्रवास सवलत शुल्क अधिस्वीकृती पत्रकारांना मिळत नाही. ती पुन्हा सुरू करण्यात यावी अशी मागणी ही करण्यात आली आहे.

# मराठा आंदोलकाना प्रशासनाने सहकार्य करावे

## राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या बापूसाहेब भेगडे यांची तहसीलदारांकडे मागणी

**वडगाव मावळ :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी देशभरातून आंदोलन क्रांतीसुर्य मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईकडे जात आहेत. हे आंदोलन मावळ तालुक्यातून जाणार आहेत. मावळ तालुक्यात असताना त्यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याची प्रशासनाने खबरदारी घ्यावी. तसेच मावळ तालुक्यामध्ये आढळलेल्या कुणबी नोंदीची यादी प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये लावण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी (अजित पवार गट) कॉँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे यांनी केली आहे.



हे निवेदन देताना संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुभाष जाधव, पुणे जिल्हा राष्ट्रवादी कॉँग्रेस उपाध्यक्ष संतोष मुऱ्हे, वडगांव शहर राष्ट्रवादी कॉँग्रेस अध्यक्ष प्रविण ढोरे, मावळ तालुका रा.युवक कॉँग्रेस मा.अध्यक्ष कैलास गायकवाड, शैलेश वहिले,मा.ग्रा.पं. सदस्य सोमनाथ धोंगडे, नितीन जांभळे,वडगावशहर युवक अध्यक्ष अतुल ढोरे, भूषण ढोरे,मुन्ना ढोरे, अनेक मान्यवर उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्र राज्यातुन आंदोलन करण्यासाठी लाखो मराठा मुंबईला पायी जात आहेत.मराठा आंदोलकांचा जाण्याचा मार्ग मावळ तालुक्यामधुन जात असल्याने त्यांना आपल्या प्रशासनाकडून सर्वोतोपरी सहकार्य व्हावे तसेच सर्वांना स्वच्छ पिण्याचे पाणी,आरोग्य व्यवस्था,लाईट व्यवस्था,टॉयलेटची व्यवस्था, इतर सर्व व्यवस्था मिळावी आणी आमच्या मराठा बांधवाना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये या सर्व गोष्टीची काळजी घ्यावी.

तसेच मावळ तालुक्यात एकुण १३५००/- कुणबी दाखले सापडले आहेत तर त्याची यादी प्रत्येक ग्रामपंचायतमधे लावावी जेणे करून आमच्या मावळच्या जनतेला वडगांव तहसील ऑफिस मधे येण्याजाण्याचा नाहक त्रास होणार नाही असेही निवेदनात म्हटले आहे.

# राजगुरूनगरमध्ये रामभक्तांनी केली दिवाळी साजरी

## प्राणप्रतिष्ठा सोहळ्याप्रसंगी हजारोंचा सहभाग : विविध मंदिरांमध्ये धार्मिक पूजाविधी

**राजगुरूनगर :** 'जय श्री राम... जय श्री राम... अशा घोषणा... मंदिर, घरोघरी रांगोळ्यांचा सडा... फुलांची आरास, आकर्षक विदयुत रोषणाई... अशा चैतन्यमयी वातावरणात राजगुरूनगर शहरासह पंचक्रोशी चा परिसर राममय झाला. राम, मारुती मंदिरांसह विविध भागात श्री राम प्राणप्रतिष्ठा सोहळा अतिशय भक्तिमय आणि जल्लोषी वातावरणात साजरा झाला. चौकाचौकांत आणि मुख्य रस्त्यांवरून रामभक्तीची दिवाळी साजरी करण्यात आली. यात मोठ्या संख्येने रामभक्त महिला, पुरुष आणि तरुणाईने सहभाग घेतला.



पिढ्यां पिढ्याच्या प्रतीक्षेनंतर अखेर सोमवार दि. २२ जानेवारीला अयोध्येत प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा दुपारी साडेबाराच्या शुभमुहूर्तावर असंख्य रामभक्तांच्या साक्षीने साजरा झाला. या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून राजगुरूनगर शहर व परिसरासह तालुक्यात अयोध्येवरून आणलेल्या अक्षतांचे घरोघरी वाटप करण्यात आले होते. रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा या गोड दिवसाची रामभक्तांकडून जोरदार तयारी करण्यात आली होती. संपूर्ण शहरात कार्यक्रमाचे होर्डिंग्ज लावले होते. जणू त्या सुवर्ण सोहळ्याचे आपण साक्षीदार आहोत आणि हे आपले परम भाग्य आहे. शहरभर अभूतपूर्व आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण होते. जणूकाही संपूर्ण राजगुरूनगर शहर आणि परिसरच जणू अयोध्या झाला आहे कि काय असा प्रश्न प्रत्येकाला पडत असावा.

शहरात ज्या परिसरातून तसेच ज्या रस्त्यावरून मिरवणूक जाणार आहे, त्या ठिकाणी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. भगव्या रंगाच्या पताका लावल्या होत्या. सोसायट्या व घरा घरांसमोर राम मंदिराच्या प्रतिकृती ठेवण्यात आल्या होत्या. मिठाई, पेढे घेण्यासाठी तसेच फुले, हार घेताना विविध ठिकाणी भाविकांची गर्दी झाली होती. अनेकजण राम, मारुतीसह विविध मंदिरांत 'जय श्री राम' लिहिलेल्या टोप्या, भगवे फेटे, भगव्या साड्या परिधान करून सकाळपासूनच दर्शनासाठी रांगेत उभे राहत असल्याचे चित्र दिसून आले.

दुचाकी, चारचाकीसह रिक्षांवर भगवे ध्वज लावून शहरातून तरुणाईने दिवसभर गावातून फिरून जल्लोष केला. दुपारी साडेबाराच्या सुमारास रामलल्लांची प्राणप्रतिष्ठा होऊन. यावेळी रामभक्तांनी आतषबाजी करीत जल्लोष केला. ब्राम्हण आळीतील राममंदिर येथे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी होती. आळंदी येथील वारकरी टाळ वाजवत व भजन गात लोकं तल्लीन झाली होती. तसेच प्रजापती ब्रम्हकुमारीच्या सेविका, घोड्यांचा नाच, या सर्व गोष्टींनी परिपूर्ण अशी शोभायात्राही काढण्यात आली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. विविध ठिकाणी डीजे, पारंपरिक वाद्याच्या तालावर महिला-पुरुषांनी आनंदोत्सव साजरा केला. विविध वेशभूषा केलेल्या राम, लक्ष्मण, सीता, हनुमान यांची मिरवणूक काढण्यात आली.

रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती येथील छ. शिवाजी महाराज पुतळा, गावची मुख्य वेस बाजरपेठ खालची वेस चिमण्या गणपती - ब्राम्हण आळी मोती बौक अहिल्यादेवी बोक सावतामाळी मंदिर पाण्याची टाकी वखार रोड संभाजीनगर तिन्हेवाडी रोड मार्गे महात्मा गांधी विद्यालय मुख्य प्रवेशद्वार, अशा मार्गावरून मिरवणूक काढून हुतात्मा राजगुरू पूल केदारेश्वर घाट येथे महाआरती संपन्न होऊन भाविकांना महात्मा गांधी शाळेत महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

**सोशल माध्यमांवरही प्रभू श्री रामांचा जयघोष**

रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे क्षण कॅमेऱ्यात टिपून अनेकांनी ते मोबाईलवर स्टेटस, डीपी म्हणून ठेवले. अनेकांनी प्रभू श्री राम यांचे फोटो, काव्यपंक्ती सोशल माध्यमांवर शेअर केल्या, रिंगटोन ट्यून ठेवून 'जय श्री राम'चा जयघोष केला.

**घरोघरी आकाशदिवे, दीप प्रज्वलन, इमारतींवर विदयुत रोषणाई**

**श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठेनिमित्त शहरातील वातावरण दिवसभर आनंदी, चैतन्यदायी होते. रामभक्तांमध्ये उत्साह पाहायला मिळाला. सायंकाळी घरोघरी दीप प्रज्वलित करून श्री रामाचा जयघोष करण्यात आला. रामभक्तांनी घरावर आकाशदिवे लावून फटाक्यांची आतषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला.**

## वयाच्या ८० व्या वर्षांतही माजी सरपंच सोपानराव म्हाळसकर यांनी केले लिखाण

# १ कोटी ५६ लाख रामनाम जप लिहून काढले

**वडगाव मावळ :** मावळ तालुक्यांचे मुख्यालय असलेल्या वडगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच श्री पोटोबा देवस्थानचे मुख्य विश्वस्त व श्रीराम भक्त सोपान बाबूराव म्हाळसकर हे गेल्या ५८ वर्षांपासून दररोज रोजनिशीबरोबरच रामनाम जप लिहीत आहे त्यांनी आत्तापर्यंत १ कोटी ५६ लाख वेळा रामनाम लिहून काढले आहे. वयाच्या ८० व्या वर्षांतही त्यांनी लेखणाचा अनोखा छंद सुरू ठेवला आहे

पूर्वीची ग्रामपंचायत असलेल्या वडगाव शहराचे सोपान म्हाळसकर हे सरपंच होते ग्रामदैवत श्री पोटोबा देवस्थानचे मुख्य विश्वस्त म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांच्या कुटुंबाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांचा वारसा लाभलेला आहे.

रामनाम जपाच्या अनोख्या छंदाबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, 'मी दोन वेळा अपघातातून बचावलो होतो. तेव्हा, नित्यनेमाने ईश्वराच्या नामस्मरणाचा सल्ला मिळाला होता.

रामनाम जप सर्वांत सोपा असल्याने तेव्हापासून ते आजतागायत दररोज नित्यनेमाने हा छंद जोपासला आहे. दररोज पहाटे पाच वाजता उठून स्नान, संध्या झाल्यानंतर सुरुवातीला रामनाम जप करतानाच तो लिहून काढतो व त्यानंतर रोजनिशी लिहीत आहे. सुरुवातीला दररोज तीनशे वेळा हा जप करत होतो. त्यात हळूहळू वाढ करून सध्या दररोज सोळाशे वेळा रामनाम जप करत आहे. ५८ वर्षांत आत्तापर्यंत १ कोटी ५६ लाख वेळा हा जप झाला आहे.'



म्हाळसकर यांनी देशातील अनेक तीर्थस्थळांना भेटी दिल्या असून श्रीरामावरील श्रद्धेपोटी आत्तापर्यंत सात वेळा ते अयोध्येला गेले आहेत. १९९२ च्या कारसेवेतही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. भूमिहीनांसाठीचा जंगल सत्याग्रह, १९६५ चे कच्छ करार आंदोलन व १९७१ चे बांगला आंदोलनातही त्यांचा सहभाग होता.

**वृत्तपत्रातील कात्रणांचाही संग्रह**

**सोपानराव म्हाळसकर जेमतेम आठवी शिकलेले आहेत. मात्र, दररोज ते वृत्तपत्र वाचतात. अगदी जुन्या काळातील ज्ञानप्रकाश व ज्ञानदीप ही वृत्तपत्रेही त्यांच्याकडे पहावयास मिळतात. त्यांनी गेल्या ५०-६० वर्षांत वृत्तपत्रांत छापून आलेल्या ऐतिहासिक, धार्मिक आदी विषयांवरील लेखांची कात्रणेही जपून ठेवली आहेत. अनेक लेखकांशी पत्रव्यवहारही केला आहे. १९८८ पासूनच्या रामजन्मभूमी आंदोलनाविषयी व श्रीरामांविषयी छापून आलेल्या अनेक लेखांचाही त्यांच्याकडे संग्रह आहे. पोटोबा देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून ग्रंथालय उभारण्याचा त्यांचा मानस आहे.**

# राजेवाडी तलावातुन सुरु असलेला पाणी उपसा त्वरीत बंद करावा



**म्हसवड :** सातारा, सांगली, सोलापुर जिल्ह्याच्या सिमेवर व माणच्या भुमीवर असलेल्या राजेवाडी तलावात अवघा २ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला असताना देखील आज ही मोठ मोठ्या विद्युत पंपाद्वारे दररोज अखंडीतपणे हजारो नव्हे तर लाखो लिटर पाण्याचा उपसा रात्रंदिवस याठिकाणी सुरु आहे, असेच चित्र आणखी काही दिवस सुरु राहिल्यास या तलावात चिमणीला देखील पाणी पिण्यास शिल्लक राहणार नसल्याची वस्तुस्थिती आहे त्यामुळे राजेवाडी तलावातुन सुरु असलेला पाणी उपसा त्वरीत बंद करावा अशी मागणी सध्या जोर धरत आहे.

यंदा पावसाने माण तालुक्यात पाठ फिरवल्याने जानेवारी महिन्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे, अशातच दररोज होणार्या हवेतील बदलाचा थेट परिणाम उपलब्ध पाणीसाठ्यावर होताना दिसत आहे. बदलत्या वातावरणामुळे विहीरी, तलावातील पाणी पातळी घटु लागली आहे, असे चित्र असताना माणच्या भुमीतील राजेवाडी तलावातुन विद्युत पंपाद्वारे अहोरात्र पाणी उपसा सुरु आहे याचा थेट परिणाम या तलावातील पाणी साठ्यावर होवु लागला असुन दररोज होणार्या हजारो, लाखो लिटरच्या पाणी उपशामुळे लवकरच हा तलाव पुर्णपणे कोरडा ठाक पडण्याची भिती अनेकांकडुन व्यक्त होत आहे.

माणच्या भुमीत असलेल्या देवापुर परिसरातील राजेवाडी तलावाचा माण तालुक्याला फारसा फायदा होत नाही या उलट सांगली व सोलापुर जिल्ह्याला याचा मोठा फायदा होत आहे. तीन जिल्ह्याच्या सिमेवर असलेल्या या तलावाची साठवण क्षमता ४७.९१ दलघमी ( दशलक्ष घनमिटर ) इतकी आहे, तर यातील उपयुक्त पाणीसाठी हा ४६.२१ दलघमी इतका आहे. असे असताना आज रोजी या तलावात अवघा १.२४ दलघमी म्हणजे अवघे २.६८ टक्के इतकाच पाणीसाठी शिल्लक राहिला असल्याचे निरा उजवा कालवा फलटण यांचेकडुन अधिकृतरित्या सांगितले जात आहे.

याचाच अर्थ सदरच्या तलावात सध्या अतिशय कमी पाणीसाठी शिल्लक राहिला आहे. सध्या तलावात अतिशय कमी प्रमाणात पाणीसाठी शिल्लक असताना देखील येथुन अहोरात्र जवळपास ५०० हुन अधिक विद्युत पंपाद्वारे पाणी उपसा सुरु आहे असेच चित्र पुढील काही दिवस असाच पाणी उपसा सुरु राहिल्यास तलवातील पाणी पातळी मृतसाठ्याच्याही खाली जाण्याची शक्यता आहे. खरे तर या तलाव परिसरातील शेतकर्यांची जनावरे सध्या याच तलावात पाणी पिण्यासाठी येत आहेत पाणी तलावात शिल्लक न राहिल्यास या जनावरांना पिण्याचे पाणी मिळणे मुश्किल बनणार आहे, तर या शिल्लक पाणीसाठ्यात असंख्य छोटे - मोठे मासे असुन याठिकाणी परिसरातील अनेक मच्छीमार मासेमारी करुन आपला उदरनिर्वाह करीत आहेत. तलावात जर पाणीच शिल्लक राहिले नाही तर या मच्छीमारांवर अक्षरशा उपासमारीची वेळ येणार आहे.

याठिकाणी मासेमारी करणार्या मच्छीमारांची संख्या १५० हुन अधिक आहे, या सर्वांची कुटुंबे उघड्यावर येणार आहेत. याचा सारासार विचार करुन जनावरांचा, पशु, पक्षांचा व जमल्यास माणसांचा ही विचार संबधित विभागाने करुन याठिकाणी सुरु असलेला पाणी उपसा त्वरीत बंद करावा अशी एकमुखी मागणी होत आहे.

# ’विधानसभा अध्यक्षांकडून सर्वोच्च न्यायालयाचा अवमान

### शिवसेना ठाकरे गटाचा दावा

**नवी दिल्ली :** आमदार अपात्रतेचा निर्णय देताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडून सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा अवमान झाला असल्याचा दावा शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधज्ञ कपिल सिबल यांनी सर्वोच्च न्यायालयात बोलताना केला. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने विधानसभा अध्यक्षांना नोटीस बजावून उत्तर देण्यासाठी दोन आठवड्यांचा कालावधी दिला आहे.

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी निकाल दिला असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गट या दोन्ही गटांच्या आमदारांना पात्र ठरविले आहे. त्याचप्रमाणे भरत गोगावले यांची प्रतोद पदी नियुक्ती त्यांनी वैध ठरवली आहे. या निर्णयामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सूचनांचा भंग झाला असून न्यायालयाचा अवमान झाला आहे असा दावा कपिल सिब्बल यांनी केला.

अध्यक्षांच्या निर्णयाविरोधात शिवसेना ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील न्या. जे. बी. पार्दिवाला व न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी पार पडली. या याचिकेचे कामकाज सर्वोच्च न्यायालया ऐवजी उच्च न्यायालयासमोर पार पाडले पाहिजे का, अशी विचारणा खंडपीठाने याचिकाकर्त्यांकडे केली. त्यावर बोलताना सिब्बल यांनी अध्यक्षांच्या निर्णयामुळे सर्वोच्च न्यायालयाचा अवमान झाला असल्याने त्याची सुनावणी सर्वोच्च न्यायालयातच व्हावी, अशी विनंती खंडपीठाला केली आहे. त्यावर खंडपीठाने अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर नोटीस बजावली असून उत्तर देण्यासाठी दोन आठवड्यांचा कालावधी दिला आहे.

## अयोध्येतील रामलल्ला मंदिर जगात सर्वात सुंदर : हरीश परदेशी

**पुणे :** अयोध्येतील राममंदिर प्राणप्रतिष्ठापना निमित्त देशभर सर्वत्र दिवाळी प्रमाणे आनंदोत्सव साजरा करण्यात आला. नमो फौंडेशन च्या वतीने सातारा रस्ता पद्मावती जवळ संपन्न झालेल्या या कार्यक्रमात महाआरती, दिपोत्सव, प्रसाद व आतिषबाजी यांचा समावेश होता.

या कार्यक्रम प्रसंगी कारसेवक प्रसेनजित फडणवीस, भूषण करमरकर, महेश काळे, सलोनी पांयाळ, ब्रम्हकुमारी अरुणादिदी, व आयोजक हरीश परदेशी, अनिल जाधव यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

आमदार माधुरी मिसाळ, नगरसेवक राजेंद्र शिळीमकर आदी मान्यवरांच्या बरोबरच विविध क्षेत्रातील नागरिक व महिला मोठ्या संखेने उपस्थित होते.

या प्रसंगी बोलतांना हरीश परदेशी यांनी अयोध्येत निर्माण करण्यात आलेले रामलल्ला मंदिर हे जगातील सर्वात सुंदर मंदिर असल्याची भावना व्यक्त केली.

# नाचता नाचता व्यायाम!

घाम गाळण्यासाठी रोमांचक आणि प्रभावी मार्ग शोधत असाल, तर तज्ज्ञांच्या सल्ल्याने तुमच्या रुटीनमध्ये झुम्बा, ॲनिमल फ्लो, डान्स वर्कआउट, जॅझरसाईझ, टबाटा आणि बूटी योगा यांचा समावेश नक्की करून पाहा!

डान्स वर्कआउट मजेदार आणि प्रभावी असले, तरी आपण ते योग्य प्रकारे करतो आहोत का ह्याची खात्री करणे आणि फिटनेस तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

तुम्ही ह्या प्रकारचा व्यायाम पहिल्यांदाच करत असल्यास तर तज्ज्ञांचे मार्गदर्शन अत्यावश्यकच आहे.

अलीकडच्या काळात कोणत्याही गोष्टीमध्ये वैविध्य आणणे अतिशय गरजेचे बनले आहे, म्हणजे कंटाळा येत नाही. हीच बाब व्यायामालाही लागू होते.

सतत एकसारखेच वर्कआउट रुटीन करत राहिल्याने कंटाळा येणे स्वाभाविक आहे. घाम गाळण्यासाठी रोमांचक आणि प्रभावी मार्ग शोधत असाल, तर तज्ज्ञांच्या सल्ल्याने तुमच्या रुटीनमध्ये झुम्बा, ॲनिमल फ्लो, डान्स वर्कआउट, जॅझरसाईझ, टबाटा आणि बूटी योगा यांचा समावेश नक्की करून पाहा!

झुम्बा : डान्स युअर वे टू फिटनेस!

हा एक हाय एनर्जी डान्सचा प्रकार आहे. हा डान्स लॅटिन आणि इतर आंतरराष्ट्रीय संगीतावर केला जातो. ज्यांना नाचायला आवडते आणि ज्या व्यक्ती हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी फिटनेस सुधारू इच्छितात, त्यांच्यासाठी हा उत्तम पर्याय आहे.

उत्तेजक संगीत आणि उत्साहपूर्ण वातावरणामध्ये आपण व्यायाम करत आहोत असे वाटतच नाही. झुम्बामुळे कॅलरी बर्निंग चांगले होते. त्याचबरोबर स्नायू टोन होतात आणि सांध्यांचे समन्वय सुधारते. त्याशिवाय डान्समुळे मिळणारा आनंद वेगळाच.

ॅनिमल फ्लो हा शरीराचे वजन वापरून करायचा व्यायाम आहे. हा प्रकार प्राण्यांच्या हालचालींपासून प्रेरणा घेऊन डिझाईन करण्यात आला आहे.

या प्रकारात शरीराची एकूण कार्यक्षमता, स्नायूंची ताकद व लवचिकता आणि गतिशीलता सुधारते. ॅनिमल फ्लो सेशनमध्ये बेअर क्रॉल, क्रॅब वॉक आणि स्कॉर्पियन रीच यांसारखे व्यायामप्रकार शिकवले जातात. फिट होण्याचा हा एक मजेदार आणि डायनामिक मार्ग आहे.

डान्स वर्कआउट : ग्रूव्ह युअर वे टू बेटर हेल्थ!

डान्स वर्कआउटमध्ये हिप-हॉप आणि बॅलेपासून समकालीन आणि अगदी पोल डान्सिंगपर्यंत विविध प्रकारच्या नृत्य शैलींचा समावेश आहे. हा प्रकार तंदुरुस्ती आणि नृत्य यांना जोडणारा धागा आहे. यामुळे शरीराची लवचिकता, संतुलन राखण्यास मदत होते.

तसेच सहनशक्तीही तपासली जाते. नृत्य एक उत्कृष्ट तणाव निवारक आहे आणि नृत्यामुळे आपल्या मेंदूमध्ये एंडॉर्फिन नावाचे हार्मोन स्रवते, त्यामुळे मन आनंदी आणि उत्साही राहते. तुम्ही अनुभवी नर्तक असाल किंवा नसाल; तरीही प्रत्येकाला करता येईल असे हे वर्कआउट आहे.

टबाटा : शॉर्ट, स्वीट ण्ड इन्टेन्स!

टबाटा हा एक हाय इन्टेन्सिटी इन्टरव्हल ट्रेनिंगचा प्रकार आहे. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त व्यायाम करायचा असेल तर टबाटाचा पर्याय स्वीकारला जातो. टबाटा सेशनमध्ये वीस सेकंद जास्तीत जास्त प्रयत्न करून व्यायाम केला जातो त्यानंतर दहा सेकंद विश्रांती घेतली जाते.

या पद्धतीने चार मिनिटे व्यायाम केला जातो, म्हणजे वर्कआउटच्या एकूण आठ फेऱ्या होतात. हे ऐकताना जरी सोपे वाटत असले, तरी हे एवढे सोपे नाही.

टबाटा वर्कआउट कॅलरी बर्न करण्यासाठी, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य सुधारण्यासाठी आणि चयापचय वाढविण्यासाठी खूपच प्रभावी आहेत. व्यग्र जीवनशैली असलेल्या लोकांसाठी हा एक नावीन्यपूर्ण मार्ग आहे.



जॅझरसाईझ : स्विंग, स्वेट ण्ड स्माईल!

जॅझरसाईझ हा १९६०च्या दशकात जुडी शेपर्ड मिसेट यांनी आणलेला डान्स फिटनेस प्रोग्राम आहे. यात जॅझ डान्स, रेझिस्टन्स ट्रेनिंग आणि संगीतावर सेट केलेल्या व्यायामाचा समावेश असतो.

ह्यात प्रशिक्षित प्रशिक्षकांसह करण्यात येणारा नृत्यकेंद्रित वर्कआउटही असतो किंवा सामर्थ्य वाढवणाऱ्या प्रशिक्षणापर्यंत विविध प्रकारचे वर्ग असतात.

हा प्रकार सामाजिक मनोरंजनावर भर देण्यासाठी ओळखला जातो, त्यामुळे तो सर्व वयोगटातील फिटनेससाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांना आकर्षक वाटतो. सध्या वैयक्तिक आणि ऑनलाइन अशा दोन्ही प्रकारात जॅझरसाईझचा आनंद घेता येणे शक्य आहे.

बूटी योगा : बिकम ट्रायबल!

हा एक प्रकारचा ट्रायबल डान्सचा प्रकार आहे. वजन कमी करण्यासोबतच तुमच्या शरीराला सुडौल करण्याचे काम हा व्यायामप्रकार करतो. बूटी योगामध्ये एकाचवेळी अनेक व्यायामप्रकार करायचे असतात. हे व्यायाम करताना चांगलीच दमछाक होते. सांधेदुखी किंवा तत्सम आजारांसाठी हा प्रकार सुचवला जातो. वर दिलेल्या सर्व व्यायाम प्रकारांची तीव्रता जास्त असल्याने तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय हे डान्स प्रकार सुरू करू नयेत. ज्या लोकांना मधुमेह किंवा उच्च रक्तदाबाचा त्रास आहे विशेषतः त्यांनी आणि व्यायाम करू इच्छिणाऱ्या इतरांनीही आपल्या शरीरासाठी कोणता प्रकार योग्य आहे.

# महावितरण बारामती परिमंडलाची कामगिरी ५ वर्षांत ५ लाख विक्रमी वीज जोडण्या

**बारामती :-** एप्रिल २०१९ ते डिसेंबर २०२३ या जवळपास पाच वर्षांच्या कालावधीमध्ये महावितरण बारामती परिमंडलाने तब्बल ५ लाख २ हजार ९१६ इतक्या विक्रमी वीज जोडण्या देण्याचे काम केले आहे. यात कृषीच्या १ लाख ९ हजार ७२ वीजजोडण्यांचा समावेश आहे. परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुनिल पावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘एक दिवस, एक गाव’, ‘मागेल त्याला कनेक्शन’ अशा विविध मोहिमा वेळोवेळी व यशस्वीपणे राबविल्याने हे उत्तुंग यश साध्य झाले आहे. परिणामी महावितरणच्या महसूलात घसघशीत वाढ झाली आहे.

बारामती परिमंडलात पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड, शिरुर, पुरंदर व भोर तालुके तर सातारा व सोलापूर हे जिल्हे येतात. श्री. सुनिल पावडे यांनी परिमंडलाचा पदभार घेतल्यापासूनच ग्राहकाभिमुख सेवेला महत्व दिले. ग्राहकाला वेळेत वीज जोडणी दिली, त्याचे बिलींग अचूक केले तर ग्राहक पैसे भरण्यास मागेपुढे पाहत नाही हा विश्वास त्यांना होता. त्यामुळे श्री. पावडे यांनी योग्य नियोजन केले. गावागावात कॅम्प लावून वीज जोडण्या दिल्या. ३१ मार्च २०१९ अखेरीस परिमंडलाची ग्राहक संख्या सुमारे २४ लाख ८९ हजार ९४२ इतकी होती. डिसेंबर २०२३ अखेरीस ग्राहक संख्येत २० टक्के वाढ झाली, हे विशेष.



आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये ९९ हजार ४३३, २०२०-२१ मध्ये ७१ हजार ६०१, २०२१-२२ मध्ये १ लाख १३ हजार ५३७, वर्ष २०२२-२३ मध्ये १ लाख २५ हजार ९५२ तर चालू आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये डिसेंबर अखेर ९२ हजार ३९३ अशा एकूण ५ लाख २ हजार ९१६ वीज जोडण्या देण्याचे काम झाले आहे. यामध्ये कृषीच्या १ लाख ९ हजार ७२ तर बिगरशेतीच्या ३ लाख ९३ हजार ८४४ वीजजोडण्यांचा समावेश आहे.

३० मीटर अंतरातील कृषी जोडणी तत्काळ

ज्या शेतकऱ्यांच्या विहीरीचे किंवा बोअरवेलचे अंतर महावितरणच्या अस्तित्वात असलेल्या वीज यंत्रणेपासून ३० मीटरच्या आत आहे, त्यांना २४ तासात कनेक्शन देण्याचे काम सुरु आहे. या अंतरातील प्रलंबित वीज जोडण्यांची संख्या शून्यावर आहे. नव्याने ज्यांना ३० मीटरच्या आतील जोडणी हवी असेल त्या शेतकऱ्यांनी स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधून अर्ज करावा. ३० मीटर ते २०० मीटर अंतरावर जोडणी देण्याचे कामही निधीनुसार केले जात आहे.

**सोमेश्वर उपविभागाची नेत्रदिपक कामगिरी**

**बारामती तालुक्यातील सोमेश्वर उपविभागाची वाटचाल दोन पावले पुढे आहे. उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री. संतोष चव्हाण यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात ‘गतिमान वीज जोडणी अभियान’ राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष घरांची संख्या व तिथे वीज जोडणी आहे का याची खात्री केली. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सर्व्हे तब्बल ५ हजारांहून अधिक जोडण्या तपासल्या. १२०० अनधिकृत आकडे काढून त्यांना वीजजोडणी घेण्यास प्रवृत्त केले. २८८ शेतीपंपाची प्रत्यक्ष अश्वशक्तीनुसार नोंद केली. ज्यामुळे वाढीव भार १६१० तर नवीन कनेक्शनमुळे ४००० असा ५६१० अश्वशक्तीचा भार अधिकृतपणे यंत्रणेत आला. सर्व्हेक्षणामुळे १३६८ घरगुती कनेक्शन वाढले. त्यांचे हे अभियान अजून थांबलेले नाही. प्रत्येक घरापर्यंत पोहोचून ते कनेक्शन वाढविण्याचे काम करत आहेत. त्यांच्या या अभियानाची दखल मुख्य अभियंता श्री. सुनिल पावडे यांनी घेतली असून, श्री. चव्हाण यांना खंबीर साथ दिली आहे.**

# जिद्दीने, कृतार्थ भावनेने केलेले कार्य म्हणजे कर्मयोग : डॉ. सदानंद मोरे

## रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे भूषण कटककर, मुक्ता भुजबले यांचा जिद्द पुरस्काराने गौरव

**पुणे :** गरजवंतांपर्यंत पोहोचून त्यांना मदतीचा हात देणे हे खरे सात्विक दान असते. ‘सुवानीती’च्या माध्यमातून व्यक्तिसापेक्ष असे संस्थात्मक काम सुरू आहे. आपण समाजाचे देणे लागतो या हेतूने, कृतार्थ भावनेने, जिद्दीने केलेले कार्य म्हणजे कर्मयोगाचा भाग असतो, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

सुवानीती फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू महिला, मुली, मुले, शाळा, मजूर वस्त्यांमध्ये जीवनोपयोगी वस्तू पुरविणारे भूषण कटककर आणि मुक्ता भुजबले यांना रंगत-संगत प्रतिष्ठानच्या काव्य विभागातर्फे जिद्द पुरस्कार डॉ. मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्या वेळी ते अध्यक्षपदावरून बोलत होते.

पुरस्कारार्थिंसह रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ड. प्रमोद आडकर आणि रंगत-संगत प्रतिष्ठान काव्य विभागाच्या कार्याध्यक्षा मैथिली आडकर व्यासपीठावर होत्या. पत्रकार भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रंगत-संगत प्रतिष्ठान आयोजित हा पंधराशेवा कार्यक्रम होता.





डॉ. मोरे पुढे म्हणाले, गरजू व्यक्तींपर्यंत मदत योग्य वेळी पोहोचली तर भविष्यात प्रश्न उद्भवत नाहीत. आपल्या संस्कृतीत दानाचा संबंध पुण्याशी जोडला गेलेला आहे. मदतीविषयी दातृत्वाची भावना असता काम नये. समाजासाठी नि:स्वार्थ भावनाने काम करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्या कार्याचा गौरव करणे ही गौरवाची बाब आहे, अशा शब्दात ड. प्रमोद आडकर यांच्या उपक्रमाचे डॉ. मोरे यांनी कौतुक केले.

स्वागतपर प्रास्ताविकात ड. प्रमोद आडकर म्हणाले, दुसऱ्यांकरता काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या फार कमी आहे. व्रतस्थपणे समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्ती, संस्थांचा गेल्या ३१ वर्षांपासून संस्थेच्या माध्यमातून सन्मान करीत आहोत.

सत्काराला उत्तर देताना भूषण कटककर म्हणाले, ग्रामीण भागातील मुलांच्या हातात मोबाईल दिसतात; पण भविष्यात करिअर कशात करायचे असते याचे त्यांना भान नसते. शिक्षण अर्धवट सोडणाऱ्यांमध्ये मुलींचे प्रमाण आजही अधिक आहे. मुलींची शिक्षणाची इच्छा असूनही त्यांना शिक्षणापासून परावृत्त केले जाते. अशा परिस्थितीत संवाद ही खऱ्या अर्थाने गरज आहे. आमच्या कार्यात योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा हा पुरस्कार आहे, अशा भावनाही त्यांनी व्यक्त केल्या.

मुक्ता भुजबले म्हणाल्या, इतरांची दु:खे पाहिल्यानंतर आपली दु:खे किती छोटी आहेत हे जाणवले. अनेकांची दु:खे आपल्यापर्यंत पोहोचत नाहीत; पण सुवानीतीच्या माध्यमातून दु:खीतांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. सेवेचा वसा प्रत्येक जन्मात घ्यायचा आहे.

पुरस्कारप्राप्त व्यक्तींचा परिचय निरुपमा महाजन यांनी केला तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि मानपत्र वाचन शिल्पा देशपांडे यांनी केले. रंगत-संगत प्रतिष्ठानच्या पंधराशेव्या कार्यक्रमानिमित्त ड. प्रमोद आडकर यांचा भूषण कटककर यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात निमंत्रितांचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सदानंद मोरे यांनी सादर केलेल्या शेरोशायरीने झाली. कविसंमेलनात डॉ. ज्योती रहाळकर, सीताराम नरके, दयानंद घोटकर, तनुजा चव्हाण, डॉ. दाक्षायणी पंडित, विजय सातपुते, मीना सातपुते, डॉ. राजश्री महाजनी, दीपक करंदीकर, भालचंद्र कोळपकर, प्रभा सोनवणे, स्वप्नील पोरे यांचा सहभाग होता. अपर्णा डोळे यांनी सूत्रसंचालन केले.

# देशात सुराज्य निर्माण करण्याची शक्ती मिळो : डॉ. नीलम गोऱ्हे

**पुणे :** रामाची दीपावली सर्व घरांमध्ये साजरी झाली आहे. यातून लोकांची भक्ती, श्रद्धा आणि आस्था दिसत आहे. जगातील, भारतातील ज्या वाईट शक्ती आहेत त्यांचा विनाश व्हावा आणि देशामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेप्रमाणे सुराज्य निर्माण करण्याची शक्ती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळावी अशी प्रार्थना विधानपरिषद उपसभापती तथा शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी केली. तसेच सदाचारकडे, चांगल्या मार्गाकडे जाण्यासाठी या उत्सवामधून शक्ती मिळावी अशी अपेक्षा डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केली.

अयोध्येतील भव्य राम मंदिरात, प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम संपन्न होत असतानाच देशभरात देखील या सोहळ्याचा उत्सव साजरा केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर आज आळंदी येथील श्री साईबाबा मंदिरात, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते भगवान श्री रामांच्या मूर्तीचे पूजन, महाआरती व होमहवन करण्यात आला. याप्रसंगी, श्री साई सेवा प्रतिष्ठान ट्रस्ट, वडमुखवाडी विश्वस्त आणि अध्यक्ष सुभाष नेलगे, शिवकुमार नेलगे, मंदिराचे पुजारी अमोल पाठक व महेश मोकाशी, पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, पोलीस सहायक आयुक्त राजेंद्रसिंह गौर, पोलीस निरीक्षक मच्छिंद्र पंडित यांसह मंदिर समिती सदस्य आणि भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.

